नि.फौ.मा.क. ४६/२०२०
सरकार -वि-लहु
**न्यायनिर्णय नि.क.४६**

| | |
|---|---|
| दाखल तारीख | १५/०६/२०२० |
| नोंदणी तारीख | १५/०६/२०२० |
| निकाल तारीख | १७/०४/२०२६ |
| कालावधी | ०५वर्षे,१०म.,०२दि. |

## भाग अ
## (न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)
## {फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (१)}

| | |
|---|---|
| | **निशाणी क.४६** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी यांचे न्यायालय**<br>पिठासीन अधिकारी :- योगेश्वर ज. वळवी | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क. १५४/२०२०<br>चामोर्शी पोलिस ठाणे. |
| न्यायनिर्णयाची तारीख | १७/०४/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | नियमित फौजदारी खटला क्रमांक ४६/२०२० |
| | CNR No. **MHGA090003112020** |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट् शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी, पोलिस ठाणे चामोर्शी. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री.एस.एस.सलामे**<br>(सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | लहु नारायण पुरकलवार<br>वय-५२ वर्ष, व्यवसाय- शेती,<br>रा. कुरुड, ता. चामोर्शी,<br>जि.गडचिरोली. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. के.टी.मुनघाटे**<br>(आरोपींतर्फे वकील) |

## भाग ब
## {फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (२)}

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०१/०४/२०२० |
| पहिल्या खबरीची तारीख | ०१/०४/२०२० |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १५/०६/२०२० |
| दोषारोपनिश्चिती तारीख | ३०/०१/२०२१ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १५/०९/२०२१ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | १७/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १७/०४/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | --- |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लहु नारायण पुरकलवार | ०१/०४/२०२० | ०२/०४/२०२० | भा.दं.वि चे कलम २९४, ३२३, ३५४, ३५४-अ ५०४ व ५०६ अन्वये | निर्दोष मुक्त | लागु नाही. | निरंक |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १९७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)}**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी**

**अ. अभियोग पक्षः**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्रं. १ | वनिता अशोक मेश्राम | पंच |
| सा.क्रं. २ | जिजाबाई सदाशिव चौधरी | फिर्यादी |
| सा.क्रं. ३ | रमेश सिताराम सातपुते | पंच |
| सा.क्रं. ४ | प्रेमिलाबाई मुर्लीधर बर्लावार | साक्षदार |
| सा.क्रं. ५ | निशा जिवनदास खोब्रागडे | तपासी अधिकारी |

**ब. बचाव साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरूप |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरूप |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

## सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणीची यादी

**अ. सरकारपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी/**पी-१६**/सा.क.१ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| २ | निशाणी/**पी-१८**/सा.क.२ | तोंडी रिपोर्ट |
| ३ | निशाणी/**पी-१९**/सा.क.२ | फौ.प्र.सं.चे कलम १६४ चे बयाण |
| ४ | निशाणी/**पी-२१**/सा.क.३ | घटनास्थळ पंचनामा |
| ५ | निशाणी/**पी-२४**/सा.क.४ | फौ.प्र.सं.चे कलम १६४ चे बयाण |
| ६ | निशाणी/**पी-३५**/सा.क.५ | एफ.आय.आर. |
| ७ | निशाणी/**पी-३६**/सा.क.५ | सुचनापत्र |
| ८ | निशाणी/**पी-३७**/सा.क.५ | पत्र |
| ९ | निशाणी/**पी-३८**/सा.क.५ | अटक पंचनामा |

**ब. बचावपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| | **--निरंक--** | |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| | **--निरंक--** | |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| अ.क. | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| | **--निरंक--** | |

## न्यायनिर्णय

(दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी घोषीत)

आरोपीवर भारतीय दंड संहितेचे कलम २९४, ३२३, ३५४, ३५४-अ, ५०४ व ५०६ अन्वये आरोप ठेवुन खटला चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त रुपात खालीलप्रमाणे आहे :

अ) फिर्यादी जिजाबाई सदाशिव चौधरी हिने पोलीस स्टेशन, चामोर्शी येथे तोंडी रिपोर्ट दिली की, दि.०१/०४/२०२० रोजीचे सकाळी अंदाजे ०६:०० वाजताचे

दरम्यान ती व तिची आई नामे प्रेमिलाबाई मुर्लीधर बर्लावार असे मिळुन मोहाफुल वेचण्याकामी तिच्या शेतात गेले आणि तिथे मोहाफुल वेचत असताना तिच्या गावातील आरोपी नामे लहु नारायण पुरकलवार हा तिथे येवुन 'तुम्ही मोहफुल का वेचता हे शेत माझे आहे' असे म्हणुन 'साले, भोसडे, रांड, मादरचोद, हेपर अशी शिवीगाळ करुन तिच्या अंगावर येवुन तिच्या छातीला पकडुन तिचे स्तन दाबला व तिचा गाउन धरुन खिचत होता आणि हाताबुक्याने मारहाण केली. त्यानंतर त्यांनी वेचलेले मोहाफुलाची टोपली फेकुन दिली, 'उदया तुम्ही मोहाफुल वेचण्याकरीता माझे शेतात आले तर तुम्हाला जिवानीशी ठार मारेन' अशी धमकी दिली.

३. सदर तोंडी रिपोर्टवरून पोलिस स्टेशन चामोर्शी येथे भा.दं.वी चे कलम ३५४, ३५४(अ),(१) ५०४, ५०६, २९४ व ३२३ नुसार अपराध क्र. १५४/२०२० अन्वये आरोपीच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर पोलिस उपनिरीक्षक निशा खोब्रागडे यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी आरोपीला अटक करुन त्याचा अटक फार्म तयार केला. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे बयान नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३५४, ३५४(अ),(१) ५०४, ५०६, २९४ व ३२३ अन्वयेच्या गुन्हयासाठी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २९४, ३२३, ३५४, ३५४-अ, ५०४ व ५०६ अन्वयेच्या गुन्हयासाठी नि.क्र. १३ वर आरोप निश्चित करण्यात आले. आरोपीला दोषारोप वाचुन व समजावून सांगीतले असता त्याने ते अमान्य केले व खटला पुढे चालविण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षातर्फे एकुण ०५ साक्षदार तपासण्यात आले. फौ.प्र.सं.कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब नि.क्र. ३९ प्रमाणे नोंदविण्यात आला. त्यात आरोपीचा बचाव नकाराचा आहे व खोटी केस केल्याचे कथन केले आहे.

५. सरकारी पक्षाची हकीकत, अभिलेखावर आलेला तोंडी व लेखी पुरावा यावरुन निराकरणासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणासह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०१/०४/२०२० रोजी सकाळी ०६.०० वाजताच्या सुमारास फिर्यादीचे शेतामध्ये मौजा कुरुड, तह.चामोर्शी, जि. गडचिरोली येथे आरोपीने फिर्यादीला "साले, भोसडे, रांड मादरचोद, हेपरी' अश्या अश्लिल भाषेत शिवीगाळ केली आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम २९४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| २. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला हाताबुक्याने मारहाण करुन इच्छापुर्वक किरकोळ दुखापत पोहोचवली आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ३२३ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| ३. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीवर फौजदारीपात्र बलप्रयोग करून तिचे स्तन दाबले आणि तिचा गाउन खेचुन विनयभंग केला आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ३५४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| ४. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचे स्तन दाबुन तिचा लैंगिक छळ केला, तसेच तिच्या गाउनला ओढुन तिच्याशी शारिरिक संपर्क साधण्याचा प्रयत्न केला आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ३५४-अ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| ५. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानित केले आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| ६. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवुन धाकदपटशहा केला आणि त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी |
| ७. | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

६. सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी वकील श्री.एस.एम.सलामे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.के.टी.मुनघाटे यांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुददे कं. १ ते ७ करीता.</u>**

७. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी एकुण पाच साक्षीदार तपासले आणि दस्ताऐवजीय पुराव्यावर आपली भिस्त ठेवली.

८. पंच साक्षीदार क. १ वनिता अशोक मेश्राम हिने तिच्या पुराव्यात सांगितले की, ती आरोपीला ओळखते. ती फिर्यादी जिजाबाई चौधरी हिला ओळखत नाही. पोलीसांनी तिला पंचनाम्याकरीता कुठेही बोलावले नाही. तिला दाखविण्यात आलेले घटनास्थळ पंचनाम्यावर तिची सही असुन त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला समर्थन न केल्यामुळे तिला सुचक प्रश्न विचारण्यात आले त्यात तिने मान्य केले की, दि.०१.०४.२०२० रोजी पोलीसांनी तिला प्रमिलाबाई बर्लावार हिचे शेतातील मोहाच्या झाडाखाली पंच म्हणुन बोलवले होते. तिने पुढे मान्य केले की, त्या ठिकाणी जिजाबाई चौधरी हजर होती व याच ठिकाणी घटना घडल्याचे पोलीसांना व तिला सांगत होती. तिने पुढे मान्य केले की, पोलीसांनी तिच्यासमक्ष दिसत्या परिस्थितीचा पंचनामा केला व खोब्रागडे मॅडमने तिला पंचनामा वाचुन दाखविला होता. तिने पुढे मान्य केले की, त्यानंतर तिने सही केली होती व त्यावेळेस तिच्यासोबत दुसरा पंच रमेश सातपुते हजर होता.

९. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात साक्ष क. १ हिने मान्य केले की, ती घटनेच्या वेळेस कुरूड गावची सरपंच होती व सरपंच असल्यामुळे पोलीस घरी येवुन तिची विचारपुस करायचे. तिने पुढे मान्य केले की, तिला पंच म्हणुन घटना स्थळावर येण्यासाठी पोलीसांनी नोटीस दिली नव्हते व पोलीस तिला घटना स्थळावर घेवुन गेले नव्हते. तिने पुढे मान्य केले की, पोलीसांनी तिच्या लिखीत कागदपत्रावर सहया घेतल्या होत्या. त्यानंतर तिने सुचक प्रश्नाला नाकारले आहे.

१०. साक्षीदार कं.२ फिर्यादी जिजाबाई सदाशिव चौधरी हिने तिच्या पुराव्यात सांगीतले की, ती आरोपीला ओळखते. घटना अंदाजे दोन वर्षापुर्वी तिच्या शेतीमध्ये सकाळी ०६.०० ते ०७.०० वाजताच्या दरम्यान घडली होती. घटनेच्या दिवशी ती तिच्या शेतामध्ये मोहफुल वेचायला गेली होती. त्यावेळेस आरोपीने तिला तुझया बापाचे शेत आहे काय? मोहफुल वेचायचे नाही, असे म्हणुन तिच्या टोपल्या फेकल्या. त्यानंतर आरोपीने मोहफुल वेचायचे नाही म्हणुन तिची छाती दाबल्यामुळे तिच्या समोरील आणि

मागील गावुन फाटल्या गेले. 'उदया जर मोहफुल वेचायला आली तर हेपुन टाकल्याशिवाय राहणार नाही' असे आरोपी बोलला. त्यावेळी तिची आई तिच्या शेतात होती आणि तेथे आरोपीचा भाउ जिवन नारायणदास पुरकलवार हा होता. त्याने तिच्या आईचा हात पकडुन बांगडया फोडल्या व उदया शेतामध्ये आले तर दोघींनाही जिवानिशी मारून टाकीन अशी धमकी जिवन नारायण पुरकलवार यांनी दिली. ती सदर घटनेमुळे घाबरून गेल्याने घरी परत आली व त्याच दिवशी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली आणि ती तक्रार नि.क्र.१८ वर असुन त्यावर तिची सही आहे आणि त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस चौकशीकरीता घटनास्थळावर आले होते. तक्रार दिल्यानंतर पोलीस तिला दवाखान्यात घेवुन गेले. डॉक्टरांनी तिला तपासले होते परंतु डॉक्टरांनी खोटे सर्टीफिकेट दिले. त्यानंतर तिचे न्यायालयात बयाण नोंदविले होते. तिला नोंदविण्यात आलेले नि.क्र. १९ वरील फौ.प्र.सं. चे कलम १६४ अंतर्गत बयान दाखविण्यात आले त्यावर तिची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे.

११. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात तिने मान्य केले की, तिच्या आईने आरोपी व त्याच्या पत्नीविरूध्द दिवाणी दावा दाखल केला होता. तिने पुढे मान्य केले की, ती जमीन तिची आहे असे म्हणुन तो दावा दाखल केला होता व ती जमीन संभाजी बुधलवार याची होती. तिने मान्य केले की, कमलबाई ही संभाजी याची पत्नी आहे. भारताबाई ही कमलबाईची भाची आहे किंवा कसे हे तिला माहित नाही. तिने मान्य केले की, कमलबाई व संभाजी हे भारताबाईकडे राहत होते आणि कमलबाई व संभाजी यांची जमीन भारताबाई व तिचे पती करत होते. तिने पुढे मान्य केले की, ती जमीन आरोपीच्या ताब्यात आहे व त्या शेतात दोन मोहाचे झाडे आहेत. तिने पुढे मान्य केले की, तिचे कुरूड हे गाव चामोर्शी पासुन पाच किलोमिटर अंतरावर आहे व कुरूड येथुन चामोर्शी येथे येण्यासाठी बस उपलब्ध असतात. तिच्या समोरील व मागील गाउन फाटला गेला ही बाब तिच्या रिपोर्टमध्ये का नमुद नाही याचे कारण तिला सांगता येणार नाही. 'मी तुला हेपुन टाकल्या शिवाय राहणार नाही' असे तिच्या रिपोर्टमध्ये का नमुद नाही याचे कारण तिला सांगता येणार नाही. तेथे आरोपीचा भाउ जिवण नारायणदास पुलकलवार हा होता त्याने तिच्या आईचा हात पकडुन बांगडया फोडल्या व उदया शेतामध्ये आले तर तुमच्या दोघीनाही जिवाणीशी मारून टाकिन अशी धमकी जिवण नारायण फुलकलवार यांनी दिली ही बाब तिच्या रिपोर्टमध्ये का नमुद

नाही याचे कारण तिला सांगता येणार नाही. हे तिला माहित नाही की, त्यांचा दावा ११/२०२० त्यांनी मागे घेतला किंवा कसे. त्यानंतर तिने इतर सर्व सुचक प्रश्नांना नाकारले आहे.

१२. पंच साक्षीदार क्र. ३ रमेश सिताराम सातपुते याने त्याच्या पुराव्यात सांगितले की, तो फिर्यादी व आरोपीला ओळखतो. महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती निशा खोब्रागडे यांनी त्याला घटनास्थळावर पंच म्हणुन बोलविले होते. घटनास्थळावर फिर्यादी हजर होती. पोलीसांनी त्याच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ पंचनामा नि.क्रं.२१ वर त्याची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. त्याच्यासोबत दुसरी पंच सरपंच वनिता अशोक मेश्राम ही होती व तिने सुध्दा त्याच्या समक्ष पंचनाम्यावर सही केली होती. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्याने मान्य केले की, पोलीसांनी त्याला पंचनामा वाचुन दाखविला नाही. त्याने मान्य केले की, त्यावेळी तो उपसरपंच होता म्हणुन त्याच्याकडे पोलीस येत होते. त्याने पुढे मान्य केले की, त्या पंचनाम्यात काय लिहिले होते हे त्याला माहित नव्हते. त्याने मान्य केले की, दि.०५.०८.२०२० रोजी पोलीसांनी सर्व्हे क्रमांक ३९१ येथे धानावर अज्ञात ईसमाने फवारणी केल्याची पाहणी करून पंचनामा केला होता. त्याने मान्य केले की, ती शेती लहुजी व त्याची पत्नी ३० ते ४० वर्षा पासुन करत आहेत. त्यानंतर त्याने इतर सर्व सुचक प्रश्नांना नाकारले आहे.

१३. साक्षीदार क्र.४ प्रेमिलाबाई मुरलीधर बर्लावार हिने तिच्या पुराव्यात सांगितले की, फिर्यादी जिजाबाई चौधरी तिची मुलगी आहे. ती आरोपीला ओळखते. घटना दोन वर्षापुर्वी तिच्या शेतात सकाळी १०.०० वाजता घडली होती. ती व तिची मुलगी मोहफुल वेचायला शेतात गेले होते. त्यावेळेस आरोपीने त्याच्या शेतात जावुन मोहफुल वेचायला कशाला आली या कारणावरून तिच्या मुलीचे गाउन पकडुन स्तन दाबले व चड्डी ओढली. त्यानंतर तिने मध्यस्थी केली असता तु येथे कशाला आली म्हणुन तिला आरोपीने ढकलुन दिले आणि पुन्हा शेतात आली तर कु-हाडीने मारून टाकीन अशी तिला धमकी दिली. त्यानंतर त्या दोघींनी पोलीस स्टेशनला येवुन तक्रार दिली. पोलीसांनी तिचे बयान घेतले होते. त्यानंतर तिने न्यायालयात सुध्दा तिचे बयाण दिले होते. तिला दाखविण्यात आलेले नि.क्रं.२४ वरील फौ.प्र.सं.चे कलम १६४ अंतर्गत घेतलेले बयानावर तिचा अंगठा असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर

असल्याचे सांगितले.

१४. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात तिने मान्य केले की, तिने आरोपी व त्याच्या पत्नीविरूध्द दिवाणी दावा दाखल केला होता. तिने सांगितले की, त्याचा नंबर ११/२०२० होता किंवा कसे हे तिला सांगता येणार नाही. तिने मान्य केले की, त्या दाव्यात आरोपींनी त्यांना हरकत अडथळा करू नये म्हणुन मनाई हुकुमाची मागणी केली होती. तिने पुढे मान्य केले की, कोर्टाने तिचा मनाई हुकुमाचा अर्ज खारिज केला होता. तिने पुढे मान्य केले की, तो दावा तिने मागे घेतला व पुन्हा नवीन दावा दाखल केला. तिने मान्य केले की, दाव्यातील जमीन संभाजी बुधलवार याची होती व कमलबाई ही संभाजी याची पत्नी होती. तिने पुढे मान्य केले की, संभाजी मरण पावल्यावर ती जमीन कमलबाई हिच्याकडे आली. तिने पुढे मान्य केले की, आरोपीच्या पत्नीचे नाव भारताबाई असे आहे. तिने पुढे मान्य केले की, कमलबाई ही भारताबाई हिची आत्या होती. तिने मान्य केले की, त्या जमीनीत मोहा झाड आहेत. तिने पुढे मान्य केले की, त्या शेतीच्या जवळ भयाजी सातपुते, प्रभु सातपुते, बन्सोड यांची घरे आहेत. तिने पुढे मान्य केले की, तिच्या जावयाकडे मोटारसायकल आहे. तिने सांगितले की, आरोपीने तिच्या मुलीची चड्डी ओढली ही बाब तिच्या जबाबात का नमुद नाही याचे कारण तिला सांगता येणार नाही. तिने पुढे सांगितले की, तिने मध्यस्थी केली असता तु येथे कशाला आली असे म्हणुन ढकलुन दिले, पुन्हा शेतात आली तर तुला कु-हाडीने मारून टाकीन अशी धमकी दिली ही बाब तिच्या जबाबात का नमुद नाही याचे कारण तिला सांगता येणार नाही. त्यानंतर तिने इतर सर्व सुचक प्रश्नांना नाकारले आहेत.

१५. साक्षीदार क्र. ५ तपासी अधिकारी निशा जिवनदास खोब्रागडे यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, दि.०१.०४.२०२० रोजी गुन्हा क्रमांक १५४/२०२० चा तपास त्यांना मिळाला व तपासकामी त्यांना एफ.आय.आर. व तोंडी रिपोर्ट मिळाले. त्यांना नि.क्रं.३५ वरील एफ.आय.आर. चा तपास सोपविण्यात आल्याचा आदेश आहे व त्यावर दाखल अमलदार व फिर्यादीची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यासाठी कुरूड शिवारात फिर्यादीच्या आईच्या शेतात गेले. त्यानंतर त्यांनी पंचांना सुचनापत्र दिले व त्यांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. त्यांना नि.क्रं.३६ वरील सुचनापत्र दाखविण्यात आले त्यावर

पंचांची व त्यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर घटनास्थळ फिर्यादीने दाखविले होते व घटनास्थळ फिर्यादीच्या आईचे शेत शिवारात होते. नि.क्रं.३१ वरील घटनास्थळ पंचनामा सायंकाळी ०५.०० ते ०६.०० वाजताच्या दरम्यान केला होता आणि त्यावर त्यांची, पंचांची व फिर्यादीची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर फिर्यादीला वैद्यकिय तपासणीसाठी पाठविले होते व त्यासंदर्भात त्यांनी वैद्यकिय अधिका-यांना पत्र नि.क्रं.३७ नुसार दिले आणि त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी आरोपीला अटक केली व अटक पंचनामा नि.क्रं.३८ वर त्यांची सही व आरोपीचे अंगठयाचे निशान असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर फिर्यादी तिच्या आईच्या शेतात मोहा फुले वेचण्यास गेली तेव्हा आरोपीने तिला हे शेत त्याचे आहे असे सांगुन शिवीगाळ केली, तिच्या छातीवर हात फिरवला व तिचे कपडे फाडले असे तपासात निष्पन्न झाले.

१६. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्यांनी सांगितले की, फिर्यादीचे आईची शेती होती हे दाखविण्यासाठी त्यांनी कागदपत्र जप्त केले नाही. त्यांनी पुढे सांगितले की, एफ.आय.आर. मध्ये नमुद टोपली त्यांनी जप्त केली नाही. त्यांनी पुढे सांगितले की, एफ.आय.आर.मध्ये गाउन फाटल्याचे नमुद आहे, तो गाउन त्यांनी जप्त केला नाही तसेच त्यांनी घटनास्थळावरुन फिर्यादीच्या आईच्या फुटलेल्या बांगडया जप्त केल्या नाही. त्यांनी पुढे सांगितले की, फिर्यादीने दाखवलेले शेत पुर्वी कोणाच्या मालकीचे होते याची त्यांनी चौकशी केली नाही व ते शेत ३५ ते ४० वर्षापासुन कोण वहिवाट करीत आहे याची त्यांनी चौकशी केली नाही. त्यांनी पुढे सांगितले की, ती शेती कमलबाई संभा बुधलवार हिच्या मालकीची होती असे तपासात आढळले किंवा कसे हे त्यांना आठवत नाही. त्यांनी पुढे मान्य केले की, घटनास्थळाच्या आजुबाजुच्या लोकांचे जबाब त्यांनी नोंदविले नाही. साक्षीदाराने स्वत:हुन सांगितले की, घटनास्थळी कोणी हजर नव्हते म्हणुन त्यांचे जबाब नोंदविले नाही. त्यानंतर त्यांनी ईतर सर्व सुचक प्रश्नांना नाकारले आहेत.

१७. सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, साक्षदारांचा पुरावा विश्वसनीय असुन आरोपीवरिल गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत करणारा आहे. त्यामुळे

आरोपीला दोषी धरुन शिक्षा करण्याची विनंती केली.

१८.      बचाव पक्षातर्फे वकीलांनी नमुद केले की, साक्षदारांचा पुरावा विश्वसनीय नाही. साक्षदारांच्या पुराव्यात अनेक विसंगती असुन शंका निर्माण करणा-या आहेत. फिर्यादी व आरोपी यांच्यात दिवाणी वाद असुन त्या वादावरुन खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिलेखावरील पुरावा आरोपीचा गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत करणारा नसल्याने आरोपीला निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

१९.      अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद विचारात घेतला.

२०.      खबर देणार साक्ष क्र. २ हिने खबरमध्ये नमुद केले आहे की, आरोपीने तिला ''साले, भोसडे, रांड मादरचोद, हेपरी' अश्या अश्लिल भाषेत शिवीगाळ केली. परंतु तोंडी पुराव्यात साक्ष क्र. २ व तिची आई साक्ष क्र. ४ हिने सदर शिवीगाळीबाबत कथन केलेले नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादी साक्ष क्र. २ हिला शिवीगाळ केल्याचा पुराव्याचा अभाव आहे. तसेच साक्ष क्र. २ हिने आरोपीने तिला हेपुन टाकल्याशिवाय राहणार नाही असे बोलल्याचे कथन केले आहे. परंतु सदर बाब नि.क्र. १८ वरील खबरमध्ये नमुद दिसत नाही. सदर बाब साक्ष क्र. २ हिने वाढवुन सांगितले आहे. त्यामुळे साक्ष क्र. २ चा पुरावा शंका निर्माण करणारा आहे. त्यामुळे मी मुददा क्र. १ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविला आहे.

२१.      साक्ष क्र. २ हिने आरोपीने तिला मारहाण केल्याचे कथन केले आहे. परंतु साक्ष क्र. २ हिला दुखापती झाल्या होत्या हे दाखविण्यासाठी अभिलेखावर कोणताही वैदयकीय पुरावा दाखल नाही. साक्ष क्र. २ हिने तिला डॉक्टरांनी तपासल्याचे कथन केले आहे. परंतु डॉक्टरांनी खोटे प्रमाणपत्र दिल्याचे नमुद केले आहे. परंतु त्याबाबत साक्षदार हिने स्पष्टीकरण दिलेले नाही. आरोपीने साक्ष क्र. २ हिला दुखापत पोहोचविली ही बाब अभिलेखावरील पुराव्यावरुन संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नाही. म्हणुन मी मुददा क्र. २ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

२२.      साक्ष क्र. २ व साक्ष क्र. ४ यांनी त्यांच्या साक्षीत आरोपीने साक्ष क्र. २

चा स्तन दाबला व गाउन खेचला असे कथन केले आहे. तसेच तो गाउन फाटला होता असे साक्ष.क्र. २ हिने कथन केले आहे. तपासी अधिका-यांनी तो गाउन जप्त केला नाही व साक्ष क्र. २ हिने तो गाउन पुराव्याकामी साक्ष क्र. ५ ला सुपुर्द केला नाही. त्यामुळे आरोपीने साक्ष क्र. २ चा स्तन दाबला व गाउन खेचुन फाडला ही बाब शंकास्पद ठरते. साक्ष क्र. २ व साक्ष क्र. ४ यांनी ते त्यांच्या शेतात असताना घटना घडल्याचे कथन केले आहे. परंतु अभिलेखावर सदर शेताचा महसुल पुरावा दाखल नाही. त्यामुळे साक्ष क्र. २ व साक्ष क्र. ४ हे शेतात गेले होते व त्यावेळी घटना घडली ही बाब शंकास्पद ठरते. साक्ष क्र. २ व साक्ष क्र. ४ यांचा पुरावा एकमेकांशी विसंगती निर्माण करणारा आहे व त्यांनी ब-याच बाबी वाढवुन सांगितल्या आहे. त्यामुळे त्यांच्या पुराव्यावर शंका निर्माण होतात. साक्ष क्र. ४ व आरोपी यांच्यात दिवाणी वाद आहे त्यामुळे दिवाणी वादावरुन खोटा गुन्हा दाखल केल्याचा बचाव संभाव्य वाटतो. त्यामुळे मी मुददा क्र. ३ व ४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

२३. खबर देणार साक्ष क्र. २ हिने खबरमध्ये नमुद केले आहे की, आरोपीने तिला "साले, भोसडे, रांड मादरचोद, हेपरी' अश्या अश्लिल भाषेत शिवीगाळ केली. परंतु तोंडी पुराव्यात साक्ष क्र. २ व तिची आई साक्ष क्र. ४ हिने सदर शिवीगाळीबाबत कथन केलेले नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादी साक्ष क्र. २ हिला शिवीगाळ केल्याचा पुराव्याचा अभाव आहे. त्यामुळे मी मुददा क्र. ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

२४. साक्ष क्र. २ हिने खबर नि.क्र. १८ मध्ये आरोपीने तिला जिवे मारण्याची धमकी दिल्याचे कथन केले आहे. परंतु साक्ष क्र. २ हिने तिच्या तोंडी पुराव्यात उदया शेतामध्ये आले तर तुम्हा दोघांना मारुन टाकीन अशी धमकी जिवन नारायण पुलकलवार याने दिल्याचे कथन केले आहे. त्यामुळे सदर बाब विसंगती निर्माण करणारी आहे. त्यामुळे मी मुददा क्र. ६ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

२५. साक्षदारांच्या पुराव्यात अनेक विसंगती आहे व शंका निर्माण करणा-या आहे. साक्षदारांनी त्यांच्या पुराव्यात वाढवुन सांगितले आहे. त्यामुळे साक्षदारांचा पुरावा विश्वसनीय नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपीवरील गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत करणारा नसल्याने आरोपीला संशयाचा फायदा देवुन निर्दोष मुक्त करणे उचित होईल. मुददा क्र. १ ते ६ चा निष्कर्ष विचारात घेता मुद्दा क्र. ७ च्या निष्कर्षाच्या

**न्यायनिर्णय नि.क.४६**

अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. आरोपी लहु नारायण पुरकलवार याला भारतीय दंड संहिताचे कलम २९४, ३२३, ३५४, ३५४-अ, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते .

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे रक्कम रु. १५,०००/- चा नविन जमानती बंधपत्र दयावे. सदर बंधपत्राची मुदत पुढील सहा महिण्यापर्यंत राहील. सदर कालावधीत आव्हान न झाल्यास बंधपत्र रद्द होईल.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2026.04.17 17:23:10 +0530

दिनांक :-१७/०४/२०२६.

{वाय.जे.वळवी}
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.